MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -२३७ | सोमवार दि.२० मे २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -237 | MONDAY DT. 20 MAY 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

## उद्या दुपारी बारावीचा निकाल!

गेवराई । प्रतिनिधी

बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी मोठी बातमी समोर आली आहे. महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक मंडळाच्यावतीने घेण्यात आलेल्या बारावी बोर्डाच्या परीक्षेच्या निकाल उद्या मंगळवारी २१ मे ला दुपारी १ वाजता ऑनलाईन पद्धतीने जाहीर होणार आहे. महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक मंडळाकडून याबाबतची घोषणा करण्यात आली आहे. त्यामुळे आता बारावीच्या विद्यार्थ्यांना आता निकालाची उत्सुकता लागली आहे. दरम्यान खाली दिलेल्या लिंकवर जाऊन तुम्हाला हा निकाल पाहता येणार आहे.'या' संकेतस्थळावर निकाल पाहता येणार 1. mahresult.nic.in 2. https://hscresult.mkcl.org 3. www.mahahsscboard.in 4. https://results.digilocker.gov.in 5. https://results.targetpublications.org बारावीच्या विद्यार्थ्यांना या संकेतस्थळावर जाऊन आपला निकाल पाहता येणार आहे. विद्यार्थ्यांना आपल्या हॉल तिकीटच्या नंबरवरून हा निकाल पाहता येईल. आता या निकालाची विद्यार्थ्यांना उत्सुकता लागली आहे.

# डॉ योगेश क्षीरसागर यांचे वीस समर्थक असलेले माजी नगरसेवक जयदत्त अण्णांच्या संपर्कात

**सायं दैनिक महाराष्ट्र आरंभ ला एका नगरसेवकाने डॉ योगेश क्षीरसागर कडून आम्हाला मिळणारी कसा आहे ते सांगितली हकिगत?**

**जयदत्त अण्णा भारत भूषण क्षीरसागर यांच्या सानिध्यात तयार झालोत आमचा मालक फक्त आणि फक्त जगताना भारत भूषण शिरसागर होऊ शकतात योगेश क्षीरसागर आमचे मालक होऊ शकत नाहीत नगरसेवकांमध्ये एकमताने हा शब्द पुढे येण्याची दाट शक्यता?**

## पाच क्विंटल गुलाल उधळणार असलेली फेसबुक वरील पोस्ट पण हेच योगेश क्षीरसागर समर्थक २० नगरसेवक नाराज का?

**मग पाच कुंटल गुलाल उधळून तुमचा काय फायदा योगेश भैया परळीच्या नादाला लागून बीडचे नगराध्यक्ष हाताने घालून नये माझी २० नगरसेवकांकडून योगेश क्षीरसागर यांना सल्ला?**

**बीड नगर परिषदेमध्ये निधी व नगरपरिषद च्या मुख्याधिकारी नीता अंधारे या डॉ योगेश क्षीरसागर यांचे ऐकत नसल्याची चर्चा नगरसेवकांमध्ये जोर धरू लागली?**





**क्षीरसागर परिवारातील डॉक्टर योगेश शिरसागर अजित पवार गटांमध्ये पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली गेल्यानंतर सुद्धा नगरसेवक असमाधानी?**
**मुस्लिम समाजातील अनेक नगरसेवक जयदत्त क्षीरसागर यांच्या संपर्कात असल्याने येणाऱ्या काळात जगतांना क्षीरसागर यांचे पारडे जड असणार?**
**डॉ योगेश क्षीरसागर बीड शहरातील २० माजी नगरसेवक हे झटका देण्याच्या तयारीत?**
**जयदत्त अण्णा भारत भूषण क्षीरसागर यांच्या सानिध्यात तयार झालोत आमचा मालक फक्त आणि फक्त जगताना भारत भूषण शिरसागर होऊ शकतात योगेश क्षीरसागर आमचे मालक होऊ शकत नाहीत नगरसेवकांमध्ये एकमताने हा शब्द पुढे येण्याची दाट शक्यता?**
**डॉ योगेश क्षीरसागर यांना वडील डॉ भारत भूषण शिरसागर चा आदर्श डोळ्यासमोर ठेवून सर्वांचे मन जपण्याची गरज. पण**

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्याच्या राजकारणामध्ये सध्याच्या राजकीय परिस्थितीमध्ये क्षीरसागर विरुद्ध मुंडे हा संघास पाहायला मिळत आहे यामध्ये यामध्ये प्रामुख्याने पाहिले तर जयदत्त क्षीरसागर हे महाराष्ट्राच्या राजकारणातील मोठं नाव आहे माजी मंत्री राहिलेले जगत शिरसागर यांच्या सर्वपक्षीय नेते हे त्यांचा शब्द हा आल्यानंतर त्या शब्दाचा सन्मान करत त्यांच्या मार्गदर्शक आशीर्वाद घेत या महाराष्ट्रामध्ये देत त्यांना खाली काम चालू आहेत परंतु यावेळी स्वर्गीय केशर काकूंच्या विचाराला व स्वर्ग गोपीनाथ मुंडे साहेब यांच्या विचाराला बाजूला सारंच यावेळी क्षीरसागर मुंडे परिवाराचा राजकारण झाल्याची चर्चा बीड जिल्ह्यामध्ये सध्या जोर धरू लागली आहे परंतु याच बीड नगरपरिषद मध्ये एकेकाळी सत्ता असलेले डॉ भारत भूषण क्षीरसागर यांच्या गेल्या ३५ वर्षाच्या एक हत्ती सत्ता असताना डॉक्टर भारत देश क्षीरसागर यांनी नगराध्यक्ष अनेक नगरसेवक व नगराध्यक्ष सभापती सर्व सामान्य कार्यकर्त्याला न्याय दिला परंतु यावेळी डॉक्टर योगेश शिरसागर यांच्याकडे आल्यानंतर मात्र डॉक्टर योगेश शिरसागर हे राजकारणामध्ये बीड शहराच्या सर्वांगीण विकासासाठी कुठेतरी कमी पडत असल्याचा भास या वीस नगरसेवकांना होत असतानाच हे माजी नगरसेवक हे बीड शहराचा आमदार ठरवणारे नगरसेवक आहेत तर यावेळी मात्र डॉक्टर योगेश क्षीरसागर यांना सोडून ते क्षीरसागर यांच्या संपर्कात असल्याची चर्चा सध्या बीड शहरांमध्ये असतानाच यावेळी डॉक्टर योगेश शिरसागर यांच्याकडून पंकजाताई मुंडे ह्या विजय झाल्यानंतर पाच क्विंटल गुलाल उधळण्याची फेसबुक पोस्ट ला हे उत्तर असल्याची चर्चा मात्र ऐकायला सुरळक नगरसेवकांच्या तोंडून मिळत आहे संध्याकाळी बसल्यानंतर बसेल भागामध्ये

**बीड शहरात लोकसभेच्या निवडणुकीमध्ये योगेश क्षीरसागर यांच्याकडून नियोजनबद्ध कार्यक्रम झाल्यामुळे पंकजाताई मुंडे यांना मतदान करा मलाच काही मिळाले नाही तर तुम्हाला काय द्यायचं असाही डॉक्टर योगेश शिरसागर यांनी काही नगरसेवकांना सवाल केला आहे तर नरेंद्र मोदी यांच्या सभेला सुद्धा नगरसेवक यांनी स्वतःहून पैसे खर्चून सभेला यायचं असंही डॉक्टर योगेश शिरसागर यांनी सांगितले होते परंतु जे पाकीट ज्या नगरसेवकांना गेले त्यामध्ये फक्त आणि फक्त दहा हजार रुपये असल्याची चर्चा यावेळी होती मात्र काही नगरसेवकांनी हे दहा हजार रुपये नरेंद्र मोदीचे सभेला जाण्याचे टाळले आहे मात्र नरेंद्र मोदी च्या सभेला जाण्या अगोदर सुद्धा बीड शहरांमध्ये ज्या नगरसेवकांनी धनंजय मुंडे असतील किंवा योगेश क्षीरसागर यांच्यासोबत आहेत त्यांनी त्यांच्यासाठी काय केलं परंतु यावेळी नगराध्यक्ष पदासाठी योगेश नगरसेवक आता रस्ता आढळण्याची दाट शक्यता आहे यावेळी मात्र याच नगरसेवकांना नगरपरिषद च्या माध्यमातून असतील किंवा पंकजाताई मुंडे यांच्या महायुतीच्या उमेदवार म्हणून असतील याच्या खर्चाबाबत सुद्धा या नगरसेवकांना कुठल्याही कार्यक्रमात असेल किंवा अन्य कोणत्याही कार्यक्रमात असतील बीड शहरातील बैठक असेल मतदानाची बूट असतील या ठिकाणी क्षीरसागर यांनी त्यांना विचारात घेतलेले नाही म्हणून हे नगरसेवक नाराज आहेत**

ही चर्चा दूर लागली असतानाच पाच क्विंटल नगुलाल उधळण्या येणार आहे मात्र हे २० नगरसेवक सोबत असतील किंवा नसतील असा प्रश्न यावेळी पडला आहे.

सध्याच्या राजकीय परिस्थितीमध्ये बारामतीचे शरद पवार असतील किंवा अजित पवार असतील यांनी शिरसागर यांचा बंगला असलेल्या स्वर्गीय किशोर काकू यांचे दोन नातू डॉक्टर योगेश क्षीरसागर आमदार संदीप क्षीरसागर यांना देतांना क्षीरसागर यांच्यापासून फोडून त्यांनी स्वतःची स्वतंत्र चूल मांडली यानंतर शरद पवारांची राष्ट्रवादी कुठून अजित पवार बाहेर पडल्यानंतर सुद्धा बीडचे पालकमंत्री व राष्ट्रवादीचे नेते धनंजय मुंडे यांनी मात्र डॉक्टर योगेश शिरसागर यांना फोडून पुन्हा एकदा जयदत्त क्षीरसागर यांच्याकडे मतदान पंकजाताईच्या पाठीशी आपलं उभा करावं म्हणून हात जोडून विनंती केली मात्र जगताना घेण्याची ठरवले असतानाच यावेळी हेच २० नगरसेवक मात्र जयदत्त अण्णाच्या याच निर्णयाचे स्वागत करत बीडच्या बीड नगर परिषदेच्या राजकारणामध्ये चर्चा जोर धरत आहे बीडच्या राजकारणामध्ये जे दत्त शिरसागर हे एक चाणक्य बुद्धीने विचार करणारा नेता व सर्वसामान्यांच्या जनतेचा जनतेच्या प्रश्नासाठी व धावणारा नेता म्हणून ओळखला जात आहे सत्तेमध्ये असतो किंवा नसो परंतु देताना यांना सर्व राजकीय नेते हे भरभरून निधी देत असतानाच योग्य क्षीरसागर मात्र आज सुद्धा धनंजय मुंडे यांच्या संपर्कात असताना योग्य क्षीरसागर यांना काय मिळतं याकडे मात्र स्वतः योग्य क्षीरसागर यांच्यात लक्ष लागलेले आहे परंतु योगेश क्षीरसागर यांना हाच पाच क्विंटल गुलाल उधळण्याच्या पोस्टचा प्रश्न नगरसेवक यांना पटलेला नाही म्हणून हा निर्णय नगरसेवक घेत असल्याची चर्चा आहे

- हेच २० माजीनगरसेवक हेमंत क्षीरसागर यांना पसंती देण्याची दाट शक्यता?
- जयदत्त क्षीरसागर यांचे बीड नगर परिषदेसाठी नियोजनबद्ध कार्यक्रम
- तर डॉ योगेश शिरसागर यांच्या वरती बीड शहरातील मोठा कार्यकर्त्यांचा वर्ग नाराज असल्याची ही चर्चा
- बीड नगर परिषदेचे सूत्र हे परळीहून हलत असल्याचे खंत नगरसेवकांना हे २० नगरसेवक मात्र अजूनही गुलदस्त्यात
- बीड नगर परिषदेमध्ये योगेश क्षीरसागर यांचा नगराध्यक्ष पदाचा प्रवास कठीणच
- हेच माझी २० नगरसेवक हे योगेश क्षीरसागर यांना नगराध्यक्ष होण्यासाठी महत्त्वाची भूमिका अनुभवणारे नायक आहेत योगेश क्षीरसागर यांच्याकडे दुर्लक्ष का केले असेल?

## डॉ योगेश क्षीरसागर यांचं राजकीय गणित चुकत आहे का?

बीड नगरपरिषद अंतर्गत कोट्यवधी रुपयाचा निधी येऊन सुद्धा नेता अंधारे या मनमानी कारभार करत नगरसेवकांना बाजूला सारून नगरपरिषद चा कारभार चालू लागल्यामुळे डॉ योगेश क्षीरसागर यांचा अंकुश नसल्याचा नगरसेवकांन मध्ये चर्चा रंगू लागली.

बीडच्या राजकारणामध्ये काम करत असताना हेच माझी २० नगरसेवक डॉक्टर भारत भूषण डॉक्टर योगेश शिरसागर यांच्या संपर्कात आहेत परंतु हेच नगरसेवक एकेकारी डॉक्टर भारत भूषण शिरसागर साहेब असतील किंवा माजी मंत्री जयंत शिरसागर असतील यांच्या संपर्कात होते या धनगर सेवकांनी डॉक्टर भारत भूषण शिरसागर यांना सोबत एक मुखाने साथ देत बीडच्या विकासाचा सिंहाचा वाटा उचलण्याचा काम या २० नगरसेवकांनी केलेला आहे परंतु डॉक्टर योगेश शिरसागर यांच्याकडून या नगरसेवकांचा माणसांना मिळत नसल्यामुळे तसेच ते म्हणजेच दीडशे भावी नगरातील डॉक्टर योगेश शिरसागर धनंजय मुंडे यांच्यासोबत अजित दादा पवार गटात गेल्यानंतर सुद्धा आपल्या हाती काहीच लागत नाही व डॉक्टर योगेश शिरसागर यांनी देतानाचा हात सोडला आहे म्हणून तर हे नगरसेवक आज घेत त्यांना यांच्या संपर्कात आहेत की जगतांना आम्ही पाठबळ देऊन पुन्हा एकदा बीडचे आमदार करणार आहोत अशी ही चर्चा करू लागले आहे मात्र यात २० नगरसेवकासह आणखीन जवळपास २५ नगरसेवकाचे एकूण ४० ते ४५ नगरसेवक हे डॉक्टर योगेश क्षीरसागर यांना अंधारातून विरोध करण्याची चर्चा करत असल्याची बीड शहरातील बचत भागांमध्ये चर्चा जोरधर आहे.

## बीडमध्ये भीषण अपघात, हायवाची रिक्षाला धडक, ३ जण गंभीर जखमी

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातून भीषण अपघाताची बातमी समोर आली आहे. भरधाव वाळूच्या टिप्परनं रिक्षाला धडक दिली. या अपघातामध्ये रिक्षाचालकासह तिघे जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमी व्यक्तींना स्थानिकांच्या मदतीनं रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. बीड शहरातील बिंदुसरा पुलावर हा अपघात झाला. दरम्यान अपघातानंतर काही काळ वाहतूक देखील ठप्प झाली होती.

घटनेबाबत अधिक माहिती अशी की, वाळूने भरलेल्या विनापरवाना भरधाव हायवाने प्रवासी रिक्षाला समोरून धडक दिल्याने रिक्षाचालकासह तिघेजण गंभीर जखमी झाल्याची घटना बीड शहरांतील बार्शी रोडवर सोमेश्वर मंदिराजवळ घडली. अपघातानंतर या रस्त्यावर वाहतूक ठप्प झाली होती. याप्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

निष्काळजीपणाने हायवा चालवून रिक्षाला धडक देऊन रिक्षाचालक व दोन प्रवाशांना जखमी केल्याप्रकरणी पोलीस शिपाई डोईफोडे यांच्या



फिर्यादीवरून हायवा चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.दरम्यान सुदैवानं या अपघातामध्ये कोणतीही जिवीतहानी झाली नसली तरी देखील तीन जण गंभीर जखमी झाले आहेत. अपघातामध्ये वाहनांचं देखील मोठं नुकसान झालं आहे. या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## माजलगावात तीन चिमुकल्याना नातेवाईकांनी सोडले पुंगनीच्या पुलावर

माजलगाव ।प्रतिनिधी

तीन चिमुकल्या मुलांना त्यांच्या नातेवाईकांनी माजलगाव तालुक्यातील पुंगनी गावच्या पुलावर पुलावर बेवारस सोडून दिले.ही घटना रविवारी गावकऱ्यांच्या लक्षात आली. पोलिसांनी मुलांना ताब्यात घेऊन अनाथ आश्रमात पोहोचवण्याची व्यवस्था केली आहे.दरम्यान आई-वडिलांच्या बेबनाव ताटातुटीत तीन चिमुकल्यांची मोठी तारांबळ होत आहे. याबाबत समजलेली माहिती अशी की,गेवराई तालुक्यातील बोरी पिंपळगाव येथील ज्ञानेश्वर जाधव यांचा माजलगाव तालुक्यातील पुंगनी येथील महिलेसोबत विवाह झाला



होता.दरम्यानच्या काळात त्यांना आर्यन(वय ६ वर्षे)अनिकेत (४ वर्षे)व आराध्या (२ वर्षे) अशी तीन मुले झाली.उभयतांत काही दिवसापूर्वी वाद झाल्याची गावकऱ्यात चर्चा आहे.यामुळे मुलांचे वडील ज्ञानेश्वर मोठ्या शहरात वास्तवास गेले,तर आईने लेकरांना नातेवाईकाच्या हवाली सोडून माहेर जवळ केले.दरम्यान काही दिवस नातेवाईकांनी मुलांना सांभाळले.परंतु आईबाप तिकडं मजा करत आहेत.आम्ही ही ब्याद का सांभाळायची?अशा भावनेने नातेवाईकांनी या तीन चिमुकल्यांना त्यांच्या आईचे गाव असणाऱ्या माजलगाव तालुक्यातील पुंगनी गावच्या पुलावर पुलावर सोडून दिले.ही बाब गावकऱ्यांच्या लक्षात येतात त्यांनी माजलगाव पोलिसांना याची माहिती दिली.दरम्यान पोलिसांनी मुलांना ताब्यात घेऊन बीडच्या बाल आश्रम ग्रहात त्यांना पोहोचण्याची व्यवस्था केली आहे. या कामी पोलीस कर्मचारी ऍटवाड, चव्हाण मॅडम,कापले मॅडम यांनी काम पाहिले.

# बिंदुसरा नदीपात्राशेजारील ३०० घरांना महापुराचा धोका

## मान्सुनपुर्व साफसफाईची जिल्हाधिका-यांना मागणी :- डॉ.गणेश ढवळे



## रणवीर पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त भेंडटाकळीत रक्तदान शिबीर संपन्न

गेवराई । प्रतिनिधी

शाशारदा स्पोर्ट अकॅडमीचे अध्यक्ष रणवीर अमरसिंह पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त मौजे भेंडटाकळी येथे भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी रणवीर पंडित यांच्या उपस्थितीत रक्तदान करून ग्रामस्थ आणि कार्यकर्त्यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी बोलताना रणवीर पंडित म्हणाले की, भेंडटाकळी येथील नागरिकांनी रक्तदान करून समाजाला एक वेगळा संदेश दिला असून रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. गावातील सर्व तरूण परिवाराने रक्तदान करून वेगळा आदर्श निर्माण केला आहे. असे सांगून रणवीर पंडित यांनी संयोजक व सर्व रक्तदात्यांचे आणि मित्र मंडळाचे आभार व्यक्त मानले. रक्तदान शिबीरामध्ये एकूण २५ रक्तदात्यांनी रक्तदान केले. याप्रसंगी रणवीर पंडित यांच्यासह माजी पंचायत समिती सदस्य मदनराव उबाळे, उपसरपंच हनुमान उबाळे, मोहनराव लोंढे, दत्तात्रय उबाळे, मदनराव लोंढे, धर्मराज उबाळे, श्याम मुळे, बाबा रडे, दत्ताभाऊ वाघमारे, रवी शिर्के, अविनाश जंगले, सुनील देवकर, रवी शिंदे, दिनकर शिंदे, डॉ. तळेकर, सरपंच श्रीराम उबाळे, प्रा.राम उबाळे, यांच्यासह ग्रामस्थ व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बीड ।प्रतिनिधी

मान्सून कालावधीत पुर अथवा वादळांमुळे नैसर्गिक आपत्ती येण्याची दाट शक्यता असते या परिस्थितीला तोंड देण्यासाठी जिल्हा प्रशासन आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करून आधिका-यांच्या बैठका घेण्याचा सपाटा लावत संबंधित कार्यालयात २४ तास नियंत्रण कक्ष सुरू करते मात्र बीड शहरातील बिंदुसरा नदीपात्रातील फ्लड झोन (पुर नियंत्रण रेषा) मध्ये सुरु असलेल्या अनाधिकृत बांधकाम आणि नदीपात्रातील उगवलेल्या बाभळीमुळे नदीपात्रात अरूंद झाले असुन झाडांना पाणी आडुन शहरात शिरण्याची दाट शक्यता असुन बिंदुसरा नदीपात्राशेजारील ३०० घरांना महापुराचा धोका असुन त्याकडे दुर्लक्ष करताना दिसत आहे त्यामुळे एकंदरीत आपत्ती व्यवस्थापनाच्या बैठका नेहमीप्रमाणेच वांझोट्या ठरणार आहेत.त्यामुळे संबंधित प्रकरणात तातडीने उपाययोजना करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे,शेख युनुस,सुदाम तांदळे , शिवशर्मा शेलार , रामनाथ खोड यांनी निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या मार्फत मुख्यमंत्री, प्रधान सचिव, विभागीय आयुक्त यांना केली आहे.

बीड शहरातील बिंदुसरा नदीपात्रातील पुर नियंत्रण क्षेत्रातील भुमाफियांकडुन करण्यात आलेल्या व सुरू असलेल्या अनाधिकृत बांधकामाकडे नगरपरिषद अधिकारी आणि कर्मचारी जाणिवपूर्वक दुर्लक्ष करत असुन बीड शहरातील नदी नाले,ओढे यांच्यावर राजकीय पुढारी, कार्यकर्ते, मुख्याधिकारी नगरपरीषद बीड, नगररचनाकार,भुमिअभिलेख, जलसंपदा विभाग कार्यालय यांनी संगनमतानेच भुमाफियांशी आर्थिक लाभातुन हातमिळवणी केली आहे.बीड शहरातील नदी,नाले,ओढे यांचे सर्व्हेक्षण करणे गरजेचे आहे.सव्हेक्षण नसल्याने रेडफ्लर्ड लाईन व ब्लूलाईन हा पट्टा ठरविण्यात आला नसल्याने नगरपरिषद प्रशासन याचा गैरफायदा घेत असुन अतिक्रमित बांधकाम प्रकरणी कंत्राटदार व जबाबदार प्रशासकीय अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी.

महापुर येण्यास पुरक्षेत्रातील अतिक्रमणे, अवैध बांधकाम कारणीभूत असुन त्यामुळे पुरबाधित क्षेत्र असलेल्या ब्लु आणि रेड झोनमध्ये बांधकामांना परवानगी देण्यात येऊ नये असे मुख्यमंत्री यांचे स्पष्ट आदेश असतानाही त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. १९८९ साली अतिवृष्टीमुळे शहरातील अनेक भागात पाणी शिरल्याने मोठ्या प्रमाणात आर्थिक व जिवितहानी झाली होती आणि २०१४ आणि २०२१ साली झालेल्या अतिवृष्टीमुळे शहरात पुर सदृश स्थिती निर्माण झाली होती. मोठ्या प्रमाणात नागरीकांना याचा फटका बसला होता.शहरातील विविध भागांमध्ये पाणी शिरल्याने शहरवासीयांना मोठ्या नुकसानीला सामोरे जावे लागले होते. बिंदुसरा नदीपात्रा शेजारील राहणा-या तब्बल ३०० घरांना महापुराचा धोका असुन नगरपालिकेकडुन कोणतीही उपाययोजना करण्यात येत नाही.यापुर्वीही अशा दुर्घटना घडुन वित्तहानी व जिवितहानी झालेली असुन शहरातील मोमीनपुरा, खासबाग,जुना मोंढा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक,पेठ बीड भागातील लोकांची पुर आल्यानंतर तारांबळ उडते. त्यामुळे तातडीने उपाययोजना करण्यात यावी.



**नदीपात्रातील बाभळबनामुळे पाणी शहरात शिरण्याची शक्यता झाडांची साफसफाई आवश्यक**

बिंदुसरा नदीपात्रात मोठमोठी बाभळीची झाडे उगवली आहेत.त्यामुळे नदीचे पात्र अरूंद व अस्वच्छ झाले आहे.या झाडांना पाणी अडुन पाणी शहरात घुसण्याची दाट शक्यता आहे.त्यामुळे तातडीने साफसफाई करण्याची आवश्यकता आहे.

बिंदुसरा नदीपात्राचा डंपिंग ग्राउंड म्हणून वापर

**नदीपात्रातील जैविक कचरा आरोग्यास घातक**

शहरातील आसपासच्या भागातील कचरा,घाण पाणी तसे रूग्णालयातील घातक कचरा उचलुन बिंदुसरा नदीपात्रात टाकला जात असल्याने नदीचे पात्र अरूंद होण्याबरोबरच नागरीकांना दुर्गंधीचा सामना करावा लागत असुन रूग्णालयातील जैविक घातक कच-यामुळे नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले आहे त्यामुळे संबंधित प्रकरणात दंडात्मक कारवाई करण्यात यावी.

# लोकसभेच्या निवडणुकी मुळे महाराष्ट्रातील बीजेपीचे त्रिमूर्ती सरकार दुष्काळ हाताळण्यात अपयशी-वसंत मुंडे

परळी । प्रतिनिधी

महाराष्ट्रामध्ये १९७२ च्या नंतर २०२४ ला खूप मोठा दुष्काळ पडला पण निष्क्रिय महाराष्ट्रातील त्रिमूर्ती सरकार सर्व बाजूंनी दुष्काळ हाताळण्यास अपयशी ठरल्याचा आरोप महाराष्ट्र ओबीसी काँग्रेस कमिटीचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केला. २०२३ च्या खरीप व रब्बी मध्ये पावसाने खूप मोठ्या प्रमाणावर ओढ दिल्यामुळे जनावरासाठी चारा छावण्या, पाणी पुरवठा संदर्भातील संकट संपूर्ण राज्यामध्ये उभे राहिले असून ग्रामीण व शहरी भागात पिण्याच्या पाण्याची टंचाई मोठ्या प्रमाणावर आज जाणवत आहे. शासनाकडून तलावातील पाणीसाठा ,विहीर बोर अधिग्रह करण्यास विलंब प्रशासनाकडून झालेला आहे. महाराष्ट्रातील आपत्ती व्यवस्थापनाकडून सर्व विभागीय महसूल आयुक्तांकडून जिल्हास्तरीय तालुकास्तरीय मंडळ निहाय तात्काळ अहवाल मागून सर्व दुष्काळा हाताळण्या संदर्भातले निकषाचे पालन करण्यास शासन स्तरावर तातडीचे आदेश देण्यात आले परंतु प्रशासनाकडून हाताळण्यास राजकीय दबावापोटी विलंब झाल्याचा आरोप काँग्रेस नेते वसंत मुंडे यांनी केला . शासन स्तरावरून दुष्काळातला विविध सवलती बाबत शासनाकडून आदेश देऊनही बँका शेतकऱ्याकडून वसुलीची कारवाई करीत आहेत, त्यांचे खाते घोटवित आहेत. तरीही प्रशासनाकडून शेतकऱ्याला दिलासा देण्यासंदर्भात ठोस पावले उचलली जात नाहीत, शेतीवरील कर्ज वसुलीसाठी थांबवणे व त्याचे पुनर्गठन करणे, कृषी पंपाचे वीज



बिलात नियमानुसार सवलत देणे, रोजगार हमीचे कामे चालू करणे, पिण्याचे पाणी टँकर द्वारे पुरवठा करणे , शालेय विद्यार्थ्यांचे संपूर्णपणे फी माफ करणे, सुशिक्षित तरुण पिढीतील सर्व युवकांसाठी विशेष बाब म्हणून रोजगार उपलब्ध करून देणे असे शासनाकडून दुष्काळा संदर्भात आदेश जरी असले तरी तालुकास्तरीय जिल्हास्तरीय विभाग स्तरीय प्रशासनाकडून हाताळण्यास विलंब झालेला आहे.शेतकऱ्यासाठी अतिवृष्टीचे, दुष्काळ निधी व २०२० पासून आज तागाचे पीक विम्याचे पैसे तात्काळ शेतकऱ्याच्या बँकेच्या खात्यात वर्ग करणे, कृषी पंपाची वीज तोडण्यात येऊ नये . पावसाने ओढ दिल्यामुळे खूप मोठ्या प्रमाणावर राज्यात नैसर्गिक आपत्ती तयार झाली असून शेतकऱ्याच्या शेतीमालाचे बाजारपेठेत अवमूल्यन झाले आहे . शासनाकडून शेतीमाला बाबतीत आयात, निर्यात धोरण केंद्र व राज्य सरकारच्या चुकीचे हाताळले जात आहे . लोकसभेच्या निवडणुकीमुळे महाराष्ट्रातील त्रिमूर्ती सरकारकडे दुष्काळ हाताळण्यात संपूर्णपणे अपयश आल्याचा आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी चे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे नी केला.

# अन्यायाला वाचा फोडणारे निर्भिड पत्रकार

## उत्तम मार्गदर्शक... संतोष जुजगर

पत्रकार हा कसा आसावा याचे उत्तम व आदर्श उदाहरण म्हणजे आमचे मार्गदर्शक मा.श्री.संतोषभाऊ जुजगर होय. दैनिक मराठवाडा साथीचे आदर्श पत्रकार संतोषभाऊ जुजगर यांच्या सारखा सर्वांना आपलेसा वाटणारा पत्रकार मित्र होय. मा.संतोषभाऊ यांच्या पत्रकारीतेबद्दल सांगायचे झाले तर संतोषभाऊ जुजगर गेल्या वीस वर्षापासून पत्रकारिता क्षेत्रात उत्तमपणे काम करत आहेत.

संतोषभाऊ जुजगर सर्वसामान्यांच्या प्रश्नासाठी झगडणारे व अन्यायाला वाचा फोडणारे पत्रकार होय. संतोषभाऊ जुजगर यांना जे-जे सत्य आजू बाजूला दिसते व तसेच आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून जगासमोर मांडतात. लेखणीच्या माध्यमातून सत्य मांडणे ही फार अवघड बाब असते, सत्यासाठी ते झगडतात ही त्यांची खास शैली आहे. वास्तविक पत्रकारितेच्या माध्यमातून अनेक कार्य त्यांनी केले आहेत. जनतेच्या समस्या दूर करण्याचे काम ते सतत करीत असतात. त्यांनी गावपातळीवरील समस्येची दखल घेतली नाही असे कधीही झालेले नाही. त्यांच्या लेखणीतून दिन-दलित व सर्वसामान्यांच्या अडीअडचणीना वाचा फोडुन न्याय देण्याचे काम या माध्यमातून केलेले आहे. तसेच त्यांचा सामाजिक, धार्मिक कार्यातही सिंहाचा वाटा असतो. परळी शहरातील होणार्या विविध सामाजिक, धार्मिक कार्यात ते हिरीरीने सहभाग नोंदवत असतात.

शहरातील सर्वसामान्यांचे विविध प्रश्न त्यांनी त्यांच्या लेखणीच्या माध्यमातून सोडवले आहेत. सत्यासाठी जे-जे खरे ते ठासून खरेच आहे, सत्याविषयी त्यांची भूमिका ठाम असते. त्यांनी माझ्या सारख्या अनेक नवीन



पत्रकारांना सतत योग्य ते मार्गदर्शन करत असतात.

संतोष जुजगर एक कुशल व निर्भिड पत्रकार आहेत, ज्यांच्या लेखनातून मराठवाड्याच्या घटनांची वृत्तपत्रिका वाढत आहे. सामाजिक दृष्टिकोनातून, त्यांनी त्यांच्या कामातून सामाजिक परिस्थिताचा लेखाजोखा अनेकवेळा मांडला आहे. त्यांच्या कामाच्या माध्यमातून समाजाच्या तरुणांना, वृद्धांना, आणि जनतेला जाण व शिकवून देण्यात मदत होते. त्यांनी समाजातील अनेक प्रश्न मार्गी लावून सामाजिक परिवर्तन केले आहे.

त्यांची पत्रकारितेच्या माध्यमातून सत्याची भुमिका अशीच अखंड रहावी, लेखणीच्या माध्यमातून सर्वांना न्याय मिळवून देण्यासाठी सदैव तत्पर रहावे, त्यांना त्यांच्या वाढदिवसानिमित्त निरोगी व उदंड आयुष्य लाभो हीच प्रभू वैद्यनाथ चरणी प्रार्थना व त्यांना वाढदिवसाच्या मनापासून हार्दिक हार्दिक शुभेच्छा...!

- बालाजी ढगे, पत्रकार,
परळी वैजनाथ.

# इस्कॉन तर्फे बाल उत्सव साजरा

बीड । प्रतिनिधी

सावता माळी चौकातील श्री राधा गोविंद मंदिर या ठिकाणी १४ मे ते १९ मे यादरम्यान लहान मुलांसाठी बाल उत्सवाचे शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. बीड शहरातील लहान मुलांनी या पाच दिवशी शिबिरामध्ये बाल संस्कार वर्ग, चित्र रंगवणे स्पर्धा, सूर्यनमस्कार, श्लोक उच्चारण, योग व प्राणायाम यावर प्रशिक्षण घेतले. विशेष करून विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, समाजसेवा, स्वच्छता, समाजामध्ये कसे वागावे त्याचबरोबर आपल्या मधील वाईट गुणांवर मात करून चांगल्या



गुणांचा कसा विकास करावा, यावरती श्रीमान कृष्णनाम प्रभू ,सुकुमारी देवी दासी, वीरजा गोपी देविदासी व चंद्रमुखी देवी दासी आदींनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

रविवार दिनांक १९ मे रोजी शिदोड येथील महालक्ष्मी मंदिरामध्ये सर्व विद्यार्थ्यांची सहल आयोजित करण्यात आली. यामध्ये विद्यार्थ्यांना आपल्या परिसरातील देवस्थानांची माहिती देऊन त्यांचे पावित्र्य कसे राखावे याविषयी विशेष मार्गदर्शन करण्यात आले अशी माहिती इस्कॉन बीड चे प्रतिनिधी श्रीमान कृष्णनाम दास यांनी दिली.

# बांधकामाच्या नावारखाली वैद्यनाथ मंदिराची ओळख नष्ट करण्याचा प्रयत्न

**परळी / प्रतिनिधी**

**परळी येथील बारा ज्योतिर्लिंगांपैकी पाचवे ज्योतिर्लिंग असलेल्या प्रभू वैद्यनाथ मंदिराचा विकास आराखड्यास शासनाने मंजुरी दिल्यानंतर प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्यात आली आहे.या बांधकामाच्या नावाखाली वैजनाथ मंदिराचे ऐतिहासिक ओळख नष्ट करण्याचा प्रयत्न होत . राष्ट्रमाता अहिल्याबाई होळकर यांनी जिर्णोद्धारात केलेले ऐतिहासिक जुने बांधकाम पाडले जात आहे. यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होताना दिसत आहे.काम सुरू करताना मंदिराची पुरातन ओळख पुसली जाणार नाही याचे जतन करुनच मंदिराचा कायापालट केला जाईल असे सांगण्यात आले होते. मात्र सध्या पूर्व भागाच्या बाजूने दर्शन मंडपाचे काम सुरू करण्यात आले असून याबाजूला असणाऱ्या काही पायऱ्या तोडून बांधकामासाठी रस्ता तयार करण्यात आला आहे.**



यामुळे मंदिराची जुनी ओळख पुसणार तर नाही ना असा प्रश्न परळीकरांना पडला आहे.

बारा ज्योतिर्लिंगापैकी पाचवे ज्योतिर्लिंग असलेल्या प्रभू वैद्यनाथ मंदिराचा कॉरिडॉरच्या माध्यमातून विकास करावा अशी मागणी येथील नागरीकांनी केली होती. या मागणीसाठी मंत्री धनंजय मुंडे यांनी सातत्याने पाठपुरावा केला. मंत्रालयात प्रशासकीय पातळीवर तसेच मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्या माध्यमातून प्रभू वैद्यनाथाच्या विकास आराखड्यास मंजुरी मिळाली. यास प्रशासकीय मान्यता मिळून प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली. दरम्यान विकास आराखड्यामुळे निर्माण होणाऱ्या सोईसुविधांमुळे शहरात पर्यटक व भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढणार आहे. यामुळे परिसरातील व शहरातील नागरीकांना रोजगाराचे साधन उपलब्ध होणार आहे. दरम्यान ५ डिसेंबर २३ मध्ये झालेल्या शासन आपल्या दारी कार्यक्रमाच वैद्यनाथ मंदिराच्या विकास आराखड्याचे भूमिपूजन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, धनंजय मुंडे, पंकजा मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले होते. यानंतर मंदिराच्या पूर्व भागात भाविकांच्या दर्शनासाठी सभामंडप बांधण्यात सुरुवात करण्यात आली आहे. या बाजूला मंदिराच्या जुन्या भव्य पायऱ्या आहेत. त्याच बाजूला प्रति वैद्यनाथाचे मंदिर आहे परळीकर याचे नित्य नेमाने दर्शन घेत असतात. या पूर्व भागातील अर्ध्या पायऱ्या तोडून बांधकामासाठी रस्ता तयार करण्यात आला आहे. यामुळे मंदगराची पुरातन ओळख पुसली जाईल. कारण बांधकाम सुरू होण्या अगोदर मंदिराची पुरातन ओळख जोपासूनच बांधकाम करण्यात येईल असे सांगण्यात आले होते. मग काम सुरू होतानाच या पायऱ्या का तोडण्यात आल्या. पायऱ्या तोडून मंदिराचा विकास नको कारण ही पुरातन ओळख जोपासूनच काम करावे व गुत्तेदारावर कारवाई करावी अशी मागणी परळीकरांनी केली आहे.

### विकास आराखड्यात होणारी कामे..

या विकास कामामध्ये भक्तांसाठी दर्शन बारी, प्रतिक्षालय, धर्मशाळा, दक्षिण मुखी गणेश मंदिर परिसरात भक्त निवास, वाहनतळ, परिसरात ठिकठिकाणी स्वच्छतागृहे, मेरू पर्वतावर कॉटेजेस, उपहार गृह, अत्याधुनिक साउंड सिस्टीम, डिजिटल दर्शन सोय, मेरू पर्वतावर उद्यान विकसित करणे वैद्यनाथ मंदिराच्या पुर्वेस हरिहर तिर्थाजवळ दर्शन मंडपाचे बांधकाम व परिसर सुधारणा करणे, दक्षिणमुखी गणेश मंदिराच्या पाठीमागे यात्री निवास बांधकाम व परिसर सुधारणा,शनी मंदिराच्या पाठीमागे धर्मशाळा यात्री निवास बांधकाम, परिसर सुधारणा, मेरु पर्वतावर उद्यान विकसित करणे, वैद्यनाथ मंदिर भोवतालीदगडी फरशी बसवणे, नगरपालिकेजवळ सुंदर वास्तूशिल्प प्रवेशद्वार, मेरु पर्वताभोवती संरक्षण भिंत, मेरु पर्वताभोवती प्रदक्षिणा मार्ग तयार करणे, हरिहर तिर्थाभोवती उद्यान विकसित करणे, संरक्षण भिंत, कारंजे, विद्युत रोषणाई आदि कामे, शहरात हँलीपँड विकसित करणे, डोंगरतुकाई मंदिराच्या आजूबाजूला संरक्षण भिंत, सभामंडप, धर्मशाळा,उद्यान विकसित करणे ही व अशी एकूण ९२ कामे करण्यात येणार आहेत.

# बीड शहर पाणी पुरवठा गणित गडबडले!

**बीड शहराच्या पाणीपुरवठ्यावर शासनाने शेकडो कोटी खर्च करून ही लोकसंख्येनुसार वॉर्डात समान पाणी वाटप नाही**

### नगर परिषद पाणीपुरवठा डीसाळ नियोजनामुळे नागरिक पाण्या पासून वंचित मान्सूनपूर्व स्वच्छता अभियानांतर्गत नाल्यांची व शहरातील स्वच्छता लवकरात लवकर करा –शेख निजाम

बीड (प्रतिनिधी)

बीड शहरातील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण झालेली आहे शासनाने अमृत पाणी पुरवठा योजनेंतर्गत शेकडो कोटी रू खर्च करून ही लोकसंख्ये नुसार वॉर्डात समान पाणी वाटप होत नाही नगर परिषद पाणीपुरवठा डीसाळ नियोजनामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे वार्डामध्ये किमान १५ ते २० दिवसानंतर नळांना पाणी येत असूनदेखील बीड नगरपरिषदेने यासंदर्भात अद्याप पर्यंत कोणतेही ठोस नियोजन केलेले दिसत नाही बीड शहरातील पाणीपुरवठा विस्कळीत झालेला असून बीड शहरातील नागरिकांकडून दररोज पाणी देण्यात येत असल्याप्रमाणेच पाणी पट्टी वसूल करण्यात येत आहे एखाद्या वार्डामध्ये १५ दिवसाला तर अनेक वार्डामध्ये २० ते २५ दिवसाला पाणी करण्यात येत असल्याचे चित्र सध्या दिसत अनेक वॉर्डत पाईप लाईन लिकेज आहे व नगर परिषदेच्या माध्यमातून टँकरद्वारे होणाऱ्या पाणीपुरवठ्यामध्ये सुद्धा मोठा गैरव्यवहार होत असून शिफारशीनुसार व तोंड बघून टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे यासंदर्भात बीड नगर परिषदेच्या मुख्याधिकारीनी लक्ष देणे हे अत्यंत



आवश्यक आहे व आता काही दिवसानंतर महाराष्ट्रामध्ये मान्सून दाखल होणार असून मागील वेळी थोड्याशा पावसामुळे बीड शहराचे अनेक भागांमध्ये घरामध्ये दुकानांमध्ये पाणी शिरले होते व नाल्यांची साफसफाई न झाल्यामुळे ठिकठिकाणी पाण्याचा योग्य निचरा न झाल्यामुळे मोठ्या प्रमाणात डबके साचले होते त्यामुळे येणाऱ्या पावसाच्या पूर्वी बीड नगर परिषदेचे मार्फत मानसून पूर्वतयारी चा भाग म्हणून बीड शहरातील छोटे मोठे नाले सरसकट साफसफाई व स्वच्छता मोहीम राबवण्यात नगर परिषदेमार्फत लवकरात लवकर राबवणे अत्यंत आवश्यक आहे व सदरील स्वच्छता अभियानामध्ये स्वच्छते संदर्भात नाले साफसफाई संदर्भात निघणाऱ्या टेंडर मध्ये कोणताही काळाबाजार होणार नाही याची दक्षता घेणे अत्यंत आवश्यक झालेले आहे त्यामुळे स्वच्छता विषयीच्या कामांमध्ये संबंधित कंत्राटदाराला त्याने केलेल्या कामांच्या व्हिडिओ शूटिंग व छायाचित्र झालेले काम मुख्याधिकाऱ्यांनी स्वतः तपासून घ्यावे व होणाऱ्या गैरप्रकार थांबवणे बाबतीत कार्यवाही करण्यात यावी अन्यथा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीनेच यासंदर्भात तीव्र आंदोलन करण्यात येईल असे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शहर प्रमुख शेख निजाम, नगरसेवक शेख अमर, हाफिज अशफाक, खय्युम इनामदार, मोमीन जुबेर,सय्यद फहीम यांनी म्हंटले आहे आहे

## गुरुवारी २५६८ वा बुध्द जयंती महोत्सव

# मौजे शिवणी येथे मोठ्या संख्येने उपस्थित रहा - पु. भिक्खु धम्मशील थेरो यांचे आवाहन

**बीड (प्रतिनिधी)**

**दरवर्षी प्रमाणे याहि वर्षी विश्ववंदनीय विश्वशांतीदुत महाकारूणीक तथागत सम्यक सम्बुद्ध यांच्या २५६८ व्या जयंती महोत्सव कार्यक्रमाचे आयोजन महाविहार धम्मभूमी डॉ. भदन्त आनंद कौसल्यायन नगर मौजे शिवणी येथे गुरुवार दि. २३ मे २०२४ दुपारी. १२.०० वा करण्यात आले आहे. या कार्यक्रमास सर्वांनी पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करून वेळेवर उपस्थित राहावे असे आवाहन पु. भिक्खु धम्मशील थेरो, प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्था, बीड. व शिवणी येथील समस्त बौद्ध उपासक, उपासिका यांच्या वतीने करण्यात आले आहे.**

या कार्यक्रमाची सुरुवात गुरुवार दि. २३ मे २०२४ सकाळी ८:०० वा डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक



न्याय भवन येथून होणार असून धम्म मिरवणुकीस प्रारंभ होऊन मिरवणुकीचा मार्ग डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा चौक असा आहे.

सकाळी ९.०० ते १२.०० वा सांस्कृतिक भिम व बुद्ध गितांचा कार्यक्रम होईल तसेच सकाळी १०.०० ते १२.०० वा सर्वांना भोजनदान देण्यात येईल. दुपारी १.०० ते ४.०० वा पु. भिक्खु संघाची धम्मदेसना होणार असून डॉ. भदन्त उपगुप्त महाथेरो (पुर्णा), डॉ. भदन्त इन्दवंरस महाथेरो (कुशीनगर), पु. भदन्त रत्नदीप थेरो (छ. संभाजीनगर) यांची प्रमुख धम्मदेसना होणार आहे.या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे विभागीय शिक्षण उपसंचालक छ. संभाजीनगर अनील साबळे, गटविकास अधिकारी, बीड अनिरुध्द सानप,पिंपळनेर पो.स्टेचे पोलीस निरिक्षक मधुसुदन घुगे यांची उपस्थिती राहणार आहे. यावेळी आलेल्या सर्व उपासक उपासिका व भिक्खु संघास भोजनदान, खिरदान कार्यक्रम उपासिका दिपाताई प्रदिप रोडे यांच्याकडुन देण्यात येणार आहे. अशी माहिती मुख्य संयोजक पु. भिक्खु धम्मशील थेरो, हिंगोली/बीड यांनी दिली आहे.

दरवर्षी प्रमाणे याहि वर्षी विश्ववंदनीय विश्वशांतीदुत महाकारूणीक तथागत सम्यक सम्बुद्ध यांच्या २५६८ व्या जयंती महोत्सव कार्यक्रमाचे आयोजन महाविहार धम्मभूमी डॉ. भदन्त आनंद कौसल्यायन नगर मौजे शिवणी येथे गुरुवार दि. २३ मे २०२४ दुपारी. १२.०० वा करण्यात आले आहे.



**अवैधरित्या गांजा बाळगुन विक्री करणा-यास पकडले**

# १२,००० रू. चा अंमली पदार्थ (गांजा) जप्त

**हिंगोली/प्रतिनिधी**


हिंगोली :-मा. पोलीस अधीक्षक, हिंगोली श्री. जी. श्रीधर यांनी हिंगोली जिल्हयातील अवैद्य धंदयाविरूध्द व शासनाने प्रतिबंधीत केलेला गांजा विक्री विरूध्द प्रभावी कार्यवाही करण्याचे आदेश स्था.गु.शा.पोनि श्री. विकास पाटील यांना दिले होते. त्या अनुषंगाने दिनांक १८/०५/२०२४ रोजी स्थागुशाचे सपोनि श्री. राजेश मलपिलु यांचे पथकाला वसमत शहर पोलीस स्टेशन हददीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनिय माहिती मिळाली की, वसमत शहरातील कौठा रोड भागात इसम नामे शेख वहीद शेख जावेद हा अवैधरित्या गांजा बाळगुन असुन विक्री करत आहे. अशी माहिती मिळाल्यावरून स्थागुशा च्या पोलीस पथकाने पंचासह दुपारी १८.०० वा दरम्यान मिळालेल्या माहीतीच्या ठिकाणी कौठा रोड वसमत शहर येथे इसम नामे शेख वहीद यांचे घरी गेले असता नमुद इसम घरी मिळुन आला व पोलीस पथकाला त्याचे ताब्यात विक्री करीता बाळगुन असलेला व शासनाने प्रतिबंधीत केलेला अमली पदार्थ (गांजा) वजन ४८० ग्रॅ. किमती १२,००० रू चा मुददेमाल मिळून आला. त्यावरून पोस्टे वसमत शहर येथे नमुद इसमाविरुध्द कलम २० (ब)ळळ एन.डी.पी.एस. ॲक्ट प्रमाणे सपोनि राजेश मलपिलु यांच्या फिर्यादी वरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सदरची कार्यवाही मा.प.लीस अधीक्षक श्री जी. श्रीधर, मा.अपर पोलीस अधीक्षक श्रीमती अर्चना पाटील, स्थानिक गुन्हे शाखेचे पो. नि. श्री विकास पाटील, यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि. श्री. राजेश मलपिलु, पोलीस अंमलदार शेख बाबर, गजानन पोकळे, विठठल काळे, गणेश लेकुळे, ज्ञानेश्वर पायघन व तुषार ठाकरे यांनी केली आहे.

# परळीतील मेरुगिरी पर्वतावरील उद्यानांची अवस्था भकास

**होरमोड** जिजामाता उद्यानात लहान मुलांसाठी खेळणी उपलब्ध नसल्याने लहानमुलांचा होरमोड

**परळी / प्रतिनिधी**

शहरात अंदाजे लहानमोठे पाच उद्याने आहेत. तीन उद्यानांचे नुतणीकरण करण्यात आले असून इतर उद्यानाचे नुतनीकरण आवश्यक आहे तर उद्यानात लहानमुलांसाठी खेळणी उपलब्ध नसल्याने लहानमुलांचा होरमोड होत आहे. शहरात सर्वात जुने जिजामाता उद्यान आहे. या उद्यानासह शहरात जवळपास चार इतर उद्याने तयार करण्यात आली आहेत. ज्यामध्ये नवीन तयार करण्यात आलेले महात्मा बसवेश्वर उद्यान विद्यानगर, शिक्षक कॉलनी, शास्त्रीनगर, दसरा उद्यान, मेरुगिरी पर्वतावरील उद्यान, औद्योगिक वसाहत उद्यान अशी शहरात उद्याने आहेत. यामध्ये जिजामाता उद्याई, महात्मा बसवेश्वर उद्यान, शास्त्रीनगर उद्यान, दसरा उद्यान यांचे नुतनीकरण करण्यात आले आहे. तर शिक्षक कॉलनीतील पंडित आण्णा मुंडे, औद्योगिक वसाहतीतील उद्यान, मेरुगिरी पर्वतावरील उद्यान वसाड झाली आहेत. शहरातील मध्यवर्ती भागात असलेले सर्वात मोठे जिजामाता उद्यान होय. जिजामाता उद्यान ज्यावेळी हे उद्यान तयार करण्यात आले तेव्हा मराठवाड्यातील सर्वात मोठे व आकर्षक उद्यान म्हणून लौकीक होता. या उद्यानात





आकर्षक व रंगीबेरंगी फुलांची झाडे, लहानमुलांसाठी विविध खेळणी, भगवान शंकराचा भव्य पुतळा उभारण्यात आला. पुढे हा शंकराचा पुतळा परळीची ओळख निर्माण करणारा ठरला. काळानुसार उद्यान खराब झाले. नंतर तर डुकरांचा सहवास या उद्यानात मोठ्या प्रमाणावर निर्माण झाला तसेच खेळणी गंजली यामुळे या उद्यानाचे नुतनीकरण करण्यात येत आहे. दोन वर्षानंतरही या उद्यानाचे काम अद्यापही अपूर्ण आहे. तसेच उद्यानाच्या बाहेर फुडमार्ट उभे करण्यात आले. याठिकाणी शहरातील खवय्ये पावभाजी, पाणीपुरी, भेळ, चायनीज पदार्थ खाण्यासाठी मोठ्या प्रमाणावर येतात पण याठिकाणी सध्या जे नूतनीकरण करण्यात आले आहे याठिकाणी लहानमुलांसाठी कोणतीही खेळणी बसविण्यात आलेली नाही. तसेच इतर जे उद्याने तयार करण्यात आली आहेत. याही ठिकाणी लहानमुलांच्या खेळणीची व्यवस्था करण्यात आलेली नसल्याने बच्चेकंपनीचा चांगलाच हिरमोड होत आहे. दरम्यान देशातील बारा ज्योतिर्लिंगापैकी पाचवे ज्योतिर्लिंग असलेल्या प्रभू वैद्यनाथाच्या विकास आराखडा पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी नुकताच मंजूर करुन त्याचे उद्घाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आले आहे. या विकास आराखड्यात मेरुगिरी पर्वतावरील उद्यान पुन्हा विकसित करण्यात येणार असून या उद्यानात लहानमुलांच्या खेळणीची व्यवस्था होणार आहे. पण हे काम पुर्ण झाल्यानंतर तोपर्यंत एवढ्या मोठ्या लोकसंख्या असलेल्या शहरात चांगले मोठे, भव्य उद्यानासह लहानमुलांच्या खेळणीची व्यवस्था असलेले उद्यानाची आवश्यकता आहे. बच्चेकंपनीसाठी खेळण्याची व्यवस्था असलेले उद्यान नसल्याने बच्चेकंपनीचा हिरमोड होत आहे. नगरपालिकेने या मागणीची दखल

# ज्ञानराधा मल्टीस्टेटच्या सुरेश कुटेसह संचालकांवर फसवणुकीचे गुन्हे दाखल

**माजलगांव शहर पोलीस ठाण्यात दोघाच्या फिर्यादीवरून गुन्हा; कुटेच्या अडचणीत वाढ**

माजलगांव ।प्रतिनिधी

मागील सहा महिन्यापासून ठेवीदारांच्या हजारो कोटीच्या ठेवी अडकून पडलेल्या ज्ञानराधा मल्टीस्टेटच्या सुरेश कुटेसह संचालकांवर अखेर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. माजलगांव येथील दोघांच्या फिर्यादीवरून शनिवारी ( दि. १८) माजलगांव शहर पोलीस ठाण्यात पाच लाख ९३ हजार ७२ हजार रुपयाची फसवणूक केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन गुन्हे दाखल झाल्याने ज्ञानराधाच्या सुरेश कुटे यांच्या अडचणीत वाढ झाली असल्याने असून ठेवीदारांच्या अडकलेले हजारो कोटी कधी परत मिळणार याबाबत शाशंकता निर्माण झाली आहे.

गेल्या सात महिन्यांपासून ज्ञानराधामध्ये जवळपास २४०० कोटींच्या ठेवी अडकल्या असून यात लाखो ठेवीदारांच्या ठेवी असून हे ठेवीदार गेल्या सात महिन्यांपासून ठेवी परत मिळतील या आशेवर आहेत. यामध्ये २१ मे ला तुमच्या



ठेवी मिळण्यास सुरुवात होईल असे आश्वासन शुक्रवारी सुरेश कुटे व ठेवीदारांमध्ये झालेल्या बैठकीत सुरेश कुटेंनी दिले. २१मे पैसे मिळतील अशी आशा ठेवीदारांना असली तरी दुसरीकडे मात्र सुरेश कुटेंवर आता गुन्हे नोंद होण्यास सुरुवात झाली आहे.काल सकाळी माजलगांव शहर पोलीस ठाण्यामध्ये सुरेश कुटे यांनी फसवणूक केल्याप्रकरणी दोन ठेवीदारांनी वेगवेगळे दोन गुन्हे नोंद केले आहेत. यामध्ये रामेश्वर मनोहर लांडे, वय ४७ व्यवसाय शेती, व्यापार, रा. शिवाजी नगर माजलगांव यांची ४ लाख १९ हजार ३५६ रुपयाच्या ठेवी ज्यादा व्याजदराचे आमिष दाखवून ठेवण्यात आल्या होत्या; परंतु त्याची मुदत संपूनही त्या त्यांना परत दिल्या नाहीत. तर दुसरे उमेश एकनाथराव थावरे, रा. शाहू नगर माजलगाव यांच्या १ लाख ७३ हजार ७१६ रूपाच्या ठेवीही ज्यादा व्याजदराचे आमिष दाखवून ठेवलेल्या ठेवी परत दिल्या नाहीत. वरील दोघांच्या फिर्यादीवरून ज्ञानराधाचे चेअरमन सुरेश कुटे यांच्यासह संचालक मंडळ, अधिकाऱ्यांवर फसवणुकीचे गुन्हे माजलगांव शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आले आहेत. सुरेश कुटे यांनी ठेवी परत देण्याचे आश्वासन दोन दिवसावर आले असताना माजलगांवमध्ये गुन्हा दाखल झाला असल्याने ठेवीदारांच्या चिंतेत वाढ झाली आहे.

### आज उघडणार होत्या शाखा


मागील सात महिन्यापासून ज्ञानराधाच्या संपूर्ण शाखा बंद असल्याने ठेवीदार मात्र शाखेत खेटे मारत होते. महिन्याभरापूर्वी ठेवीदार आणि चेअरमन सुरेश कुटे यांच्यात झालेल्या बैठकीत २१ मे पासून ठेवीदारांना पैसे देण्याचे अआश्वसन दिले होते. यासाठी शनिवारी मजल्गावातील शाखाही उघडणार होत्या; परंतु सकाळीच पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्याने शाखेचे कुलूप उघडले नाही.

# डॉ. आंबेडकर चौक ते माने हॉस्पीटल रस्त्यावर समस्यांचा ढिगारा

**प्रशासकाचे कमालीचे दुर्लक्ष; कार्यवाहीची मागणी**

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई येथील राष्ट्रीय महामार्ग अंतर्गत ताकडगाव रोडवर न .प हद्दीत घाणीचे साम्राज पसरून आजारांमध्ये मोठी वाढ झाली आहे . नाल्यातील कचरा व घाण गेली कित्येक महिने उचलली जात नाही . ताकडगाव जकात नाका , सरस्वती कॉलनी नंबर २, सिद्धीविनायक कॉलनी, हनुमान नगर , सेंट झेवियर्स स्कूल रोड, अंतर्गत रस्ते, ढोराज नगर, शारदा स्कूल, बाळराजे नगर , इंजि .पत्की यांच्या घराकडे जाणारा अंतर्गत रस्ता, श्रीराम हॉस्पीटल ते डॉ खाडे हॉस्पीटल भाग नगर परिषद हद्दीत येतो . या परिसरातील खोल खोल नाल्या , त्यात साचलेली घाण आणि कचरा यामुळे दुर्गंधी सुटून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे . या ताकडगाव रोडवर समस्यांचा ढिगारा आहे . डांबरी रस्ता झाला पण पांढरे पट्टे, गतिरोधक नाहीत, स्पीड ब्रेकर नाही , स्पीड ब्रेकर दिशादर्शक फलक टाकण्यात आलेले नाहीत . का टाकले नाहीत हे एक कोडंच आहे .नाल्यांचा कचरा उचलला जात नाही . या रोडवर शैक्षणिक शाळा , माध्यमिक व उच्च माध्यमिक महाविद्यालये, बालक मंदिर , खाजगी कोचिंग क्लासेस , नोकरदार वर्ग मोठ्या प्रमाणात आहेत . आंबेडकर चौकातून ताकडगाव रोडला जाणाऱ्या पाईंटला टो रिक्षावाले राष्ट्रीय महामार्गावर रस्त्याच्या मध्येच रिक्षा उभी करतात . जकात नाका पॉईंट ते डॉ .रांदड हॉस्पीटल येथे दुकाने आहेत . त्यांच्या समोरच दुचाकी मोठ्या प्रमाणात उभ्या असतात . त्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढले आहे . बुलेट गाडीमधून तोफेचा आवाज काढणारे तरुण बेभान गाडी चालवतात . त्यांच्यावरही पोलिस दलातील अधिकारी व कर्मचारी यांचे कुणाचेच नियंत्रण नाही .वाळू, मुरूम, डब्बरचे ट्रॅक्टर व हायवा गाडया सुसाट वेगाने या रोडवर चालविल्या जातात . लहान शाळकरी मुलं आणि जेष्ठ नागरिक यांचे जाणे - येणे या रस्त्याने चालू असते . या सर्वांवर नियंत्रण करायचे असेल तर गतिरोधक त्वरित बसविणे आवश्यक आहे . या रस्त्यावर अनेकांनी आपापल्या दुकाने व प्रतिष्ठानेसमोर अनधिकृत शेड टाकून रोडपर्यंत दुकाने , दुकानांचे विक्रीचे साहित्य रस्त्यावर मांडून व्यवसाय सुरू केले आहेत . त्यामुळे रहदारीस अडथळा निर्माण होत आहे . ही अतिक्रमित जागा न .प. सी ओ तथा प्रशासक मांडुरके यांनी पाडून रस्ता मोकळा करावा , या रस्त्यावर जीव घेणे खड्डे पडले आहेत . डॉ ढोराज हॉस्पीटलसमोर, श्रीराम हॉस्पीटलच्या जवळ तसेच न्यू हायस्कूलसमोर नाली कोंडून २ वर्ष झाले पण नाली उखडून नवी तयार करावी .नव्याने नाली केली तरच नाल्यातील अशुद्ध घाण रस्त्यावर येणार नाही . सध्या तेथे चिंतनीय अवस्था



झाली आहे . पवार हॉस्पीटल व ढोराज हॉस्पिटलसमोर कचऱ्याचे साम्राज्य पसरले आहे . स्वच्छतेचे कंत्राट घेतलेल्या कंत्राटदाराच्या दृष्टीस ही बाब आणून दिली आहे . परंतू बघू म्हणतात . सरस्वती कॉलनी नं . २ भागात न. प .चे ३ नगरसेवक निवडून आलेले आहेत पण न्यू हायस्कूल समोरील अतहरखा पठाण ते ड .नाकाडे निवास रोड, नाकाडे ते प्रविण पंडित रोड, पंडित ते जरांगे सर रोड , मंगेश खरात - जगदाळे ते सोलाने निवास हा रस्ता गेल्या १५ वर्षापूर्वी तयार केलेला आहे . तो मृत्यूची शेवटची वाट पाहात आहे . न्यू हायस्कूल शेजारी फळ व भाजीपाला विक्रेते नालीपासून पुढे रोडवर १० फूट आले आहेत . या भागातील गर्दी पाहता त्यांनी मागे सरकून नाल्यावर हातगाड्या उभ्या केल्या तर अपघात होणार नाही . प्रशासक आणि स्वच्छता निरीक्षक यांनी नियमित पाहणी केली आणि हातगाड्यावर भाजी विक्रेते मागे सरकतील . या भागात राहणारे ३ नगरसेवक व लाभार्थी कार्यकर्ते या समस्येकडे पाहून डोळेझाक करीत आहेत . नगर परिषद प्रशासक मांडुरके यांच्या नियंत्रणात आहे . त्यांनी कार्यालयाच्या बाहेर स्वच्छता निरीक्षक यांच्यासह येऊन प्रत्यक्ष पाहणी करावी .तशी त्यांची ड्युटीच आहे . गेवराई शहरात मतदार नसलेल्या नवनवीन भागात सिमेंटची रस्ते बांधण्यात आली आहेत पण सरस्वती कॉलनी नं २ मधील समस्यांकडे कुणाचे लक्ष नाही . मतदान मागायला धावत येतात पण जनतेची कामे करीत नाहीत . न . प . मुख्याधिकारी तथा प्रशासक मांडुरके यांनी जातीने लक्ष घालून कार्यवाही करावी, अशी मागणी ताकडगाव रोड वरील सर्व नागरिकांनी केली आहे .

## भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या मराठवाडा उपाध्यक्ष पदी अविनाश कच्छवे

माजलगाव (प्रतिनिधी)

मराठवाड्यात सामाजिक कार्यकर्ते व परभणी जिल्ह्यातील एक चांगल व्यक्तिमत्व अविनाश कच्छवे यांचे सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य पाहून समितीच्या मराठवाडा उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली नुकतीच मुंबई येथे कार्याची दखल घेऊन एम बी फड साहेब यांच्या शिफारशीनुसार निवड करण्यात आली आहे. भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष रबिन्द्र द्विवेदी साहेब व भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे राष्ट्रीय कार्यवाहक अध्यक्ष आलोक रबिन्द्र द्विवेदी साहेब यांच्या हस्ते कच्छवे यांना नियुक्तीपत्र ओळखपत्र देण्यात आले आहे. मराठवाड्यात भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे, काम अधिक जोमात करणार असुन त्यांच्या व विश्वासाला मी तडा जाऊ देणार नाही असे कच्छवे यांनी विश्वास व्यक्त केला त्यांच्या निवडीबद्दल भ्रष्टाचार निर्मुलन समितीचे महाराष्ट्र अध्यक्ष मधुकर पतंगे, मराठवाडा अध्यक्ष ज्ञानोबा चाटे व बीड जिल्हाध्यक्ष परमेश्वर सोळंके संजय तिखे पाटिल दक्षिण महाराष्ट्र अध्यक्ष बाळासाहेब इथापे महाराष्ट्र सचिव अनंत वरवटे तुळशीराम लुंगारे तसेच बीड जिल्हा उपाध्यक्ष मधुकर ढगे माजलगाव तालुका अध्यक्ष सिद्धेश्वर गायकवाड उपाध्यक्ष गणेश तोर माजलगाव संघटक अंगत दराडे धारूर तालुका अध्यक्ष बाळासाहेब सोळंकेआदींनी अभिनंदन केले आहे.






बीड ।प्रतिनिधी

**बीड तालुक्यातील भवानवाडी येथे रोजगार हमी योजनेच्या कामात परस्पर बोगस सह्या मारून मस्टर काढण्यात आले, यामध्ये लाखोचा भ्रष्टाचार करण्यात आला. एकूण बारा मस्टर वर बोगस सह्या मारून सदरील मस्टर काढण्यात आले. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) उपजिल्हाप्रमुख हनुमान जगताप यांनी भवानवाडी येथील ग्रामस्थांना घेऊन सदरील बीड पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांची भेट घेऊन हा प्रकार पुराव्यासहित उघडकीस आणला आहे.अधिकारी आणि रोजगार सेवक यांच्या बोगसह केल्याने एकच खळबळ उडाली आहे.**

# धारूरमध्ये जीईएम पोर्टल वरील खरेदीच्या नावाखाली मोठा भ्रष्टाचार

## पंधरावा वित्त आयोगाच्या निधीची लावली जाते विल्हेवाट

प्रतिनिधी ।धारुर

शासनाने गावातचा विकास व्हावा यासाठी दरवर्षी पंधरावा वित्त आयोगाच्या माध्यमातून निधी देण्यात येतो . हा निधी नियमानुसार खर्च करण्यात यावा तसेच होणारा भ्रष्टाचार थांबवा यासाठी जीईएम पोर्टलच्या माध्यमातून साहित्य खरेदी करण्यात येते .परंतु धारूर तालुक्यात जीईएम पोर्टलवर होणारी खरेदी ही नियमानुसार न करता ती मॅनेज करून बोगसपणे करण्यात येत आहे .यामुळे होणारा भ्रष्टाचार थांबण्याऐवजी मोठ्या प्रमाणात वाढत आहे . याची वरिष्ठाकडून चौकशी करण्याची मागणी होत आहे .




ग्रामीण भागातील विकासाची कामे व्हावीत यासाठी ग्रामविकास खात्यामार्फत दरवर्षी निधी देण्यात येतो .हा निधी लोकसंख्येच्या आधारावर वितरित होतो .सध्या १५ व्या वित्त आयोगाच्या नावाने हा निधी थेट ग्रामपंचायतकडे वर्ग करण्यात येत आहे .हा निधी खर्च करण्यासाठी शासनाने नियम अटी लागू करण्यात आलेले आहेत .या निधीतून पाणी , स्वच्छता ,आरोग्य , शिक्षण, आदी बाबीवर निधी खर्च करण्यासाठी नियम घालून देण्यात आलेले आहे .काही निधी साहित्य खरेदी करण्यासाठी जीएम पोर्टलची अट शासनाने लादली आहे .ही अट मागील दोन ते तीन वर्षापासून सुरू करण्यात आलेली आहे .या पोर्टलवर ग्रामपंचायतींना साहित्य खरेदी करून त्याच्या ऑनलाईन पावत्यानुसार निधी अदा करण्याचे आदेश आहेत .परंतु जीईएम पोर्टलवर खरेदी करताना ही खरेदीचे नियमबाह्य पद्धतीने करण्यात येत आहे . पोर्टल चालवणाऱ्या व्यक्तींकडून खरेदीची पूर्णपणे मॅनेजमेंट करून देण्यात येते .ही खरेदी ऑनलाईन पद्धतीने न करता अनेक वेळा ऑफलाइन पद्धतीने ही करण्यात येत आहे .यामुळे ही खरेदी जीएम पोर्टलवरून न करता कुठेतरी एखाद्या खाजगी दुकानावरून करण्यात येते .यामुळे त्यामध्ये मोठ्या प्रमाणात साहित्याचा दर्जा राखला जात नाही . जीईएम पोर्टलवर खरेदी मॅनेज करून आव्वाच्या सव्वा बिले नोंदवून निधीची मात्र विल्हेवाट लावण्यात येत आहे .काही पोर्टल धारक जीईएम पोर्टल चालवत असून सरपंच आणि ग्रामसेवकांना सर्व खरेदी बिले मॅनेजमेंट करून देण्याचे काम करत आहेत .यामुळे मोठ्या प्रमाणावर गावाच्या विकासाच्या साठी आलेल्या निधीची नियमबाध्य विल्हेवाट लावली जात आहे .याकडे पंचायत समितीचे विस्तार अधिकारी , गटविकास अधिकारी यांची उघडपणे डोळेझाक होताना दिसत आहे .या बाबीकडे वरिष्ठांनी लक्ष देऊन जीईएम पोर्टलवर होणारी नियमबाह्य खरेदी थांबवण्याची मागणी सामान्य जनतेतून होत आहे

# राज्यात आज अंतिम टप्पा; मुंबई, ठाणे, नाशिकसह १३ मतदारसंघात मतदान

, २६४ उमेदवार रिंगणात

मुंबई : लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या आणि राज्यातील अखेरच्या टप्प्यात आज, सोमवारी मुंबईतील सहा मतदारसंघांसह ठाणे, कल्याण, भिवंडी, पालघर, नाशिक, दिंडोरी आणि धुळे अशा १३ मतदारसंघांत मतदान होणार आहे. या टप्प्यात तीव्र उकाडय़ामुळे हैराण झालेल्या मतदारांना बाहेर काढण्याचे आव्हान राजकीय पक्षांसमोर आहे. या टप्प्यात दोन कोटी ४६ लाख मतदार मतदानाचा हक्क बजावणार असून ते २६४ उमेदवारांचे भवितव्य निश्चित करतील.

राज्यात चार टप्प्यांमध्ये सरासरी ६२ टक्के मतदान झाले असले तरी मुंबई आणि ठाण्यात मतदानाची टक्केवारी वाढवण्यावर पक्षांचा कटाक्ष असेल. अखेरच्या टप्प्यातील १३ मतदारसंघांमध्ये २४ हजार ५७९ मतदान केंद्रे आहेत. त्यापैकी १६० मतदान केंद्रे संवेदनशील म्हणून घोषित करण्यात आली आहेत. मुंबईत जेमतेम ५० टक्क्यांच्या आसपास मतदान होते. मुंबईत २०१९ मध्ये सरासरी ५५ टक्के मतदान झाले होते. सुट्टीमुळे हजारो मतदार आधीच मुंबईबाहेर गेले आहेत. त्यातच तीव्र उन्हाळय़ाचा मतदानाच्या टक्केवारीवर परिणाम होऊ शकतो. तो टाळण्यासाठी उमेदवारांनी आपापल्या मतदारांना सकाळी १० वाजेपर्यंत मतदान करण्याचे आवाहन केले आहे. नाशिक, दिंडोरी आणि धुळय़ातही तीव्र उन्हामुळे मतदानाची टक्केवारी वाढवण्याचे आव्हान आहे.

शहरी भागातील मतदान वाढवण्यासाठी निवडणूक आयोगाने विविध माध्यमांचा वापर करून अनेक उपक्रम राबवले. त्यातून मतदारांना मतदानासाठी प्रोत्साहित करण्याचा प्रयत्न केला. तसेच मतदारांना उन्हाचा त्रास होऊ नये, अधिक वेळ रांगेत उभे राहू लागू नये यासाठी यंत्रणनेने विविध सोयी-सुविधांची सज्जता ठेवली आहे. दरम्यान, शहरी भागातील




मतदारांनी सोमवारी मोठय़ा प्रमाणात मतदान करावे, असे आवाहन राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकिलगम यांनी केले आहे.

सकाळी ७ ते सायंकाळी ६ अशी मतदानाची वेळ आहे. मतदान प्रक्रियेत बाधा निर्माण करणे, मतदान केंद्रांवरील शांतता भंग करणे तसेच कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करण्यासाठी मोबाइलचा गैरवापर होण्याची शक्यता गृहीत धरून मतदान केंद्रांवर मोबाइल घेऊन जाण्यास मज्जाव करण्यात आला आहे. मतदारांना मतदान केंद्रापासून १०० मीटर अंतरावर मोबाइल ठेवून मतदानासाठी जावे लागेल.

### मतदानासाठी १२ ओळखपत्रांचा पर्याय

मतदार छायाचित्र ओळखपत्राव्यतिरिक्त इतर १२ ओळखीचे पुरावे म्हणून ग्राह्य धरण्यात आले आहेत. त्यापैकी कोणताही एक पुरावा दाखवल्यानंतर मतदान करता येईल. मतदार ओळखपत्र नसलेल्या मतदारांसाठी पारपत्र (पासपोर्ट), वाहन चालक परवाना (ड्रायिव्हग लायसन्स), केंद्र अथवा राज्य शासन, तसेच सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, पब्लिक लिमिटेड कंपन्यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना वितरित केलेले छायाचित्र ओळखपत्र, बँक किंवा टपाल विभागातर्फे छायाचित्रासह वितरित केलेले पासबुक, पॅन कार्ड, राष्ट्रीय लोकसंख्या नोंदवही अंतर्गत भारतीय महानिबंधक आणि जनगणना आयुक्तांनी जारी केलेले स्मार्ट कार्ड, 'मनरेगा'चे रोजगार ओळखपत्र, निवृत्तिवेतनाची कागदपत्रे, संसद, विधानसभा, विधान परिषदेच्या सदस्यांनी दिलेले अधिकृत ओळखपत्र, आधार कार्ड, भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सशक्तीकरण मंत्रालयाच्या वतीने अपंगांना दिलेले विशेष ओळखपत्र, कामगार मंत्रालयाद्वारे वितरित आरोग्य विमा स्मार्ट कार्ड हे पुरावे मतदानासाठी ग्राह्य धरले जाणार आहेत.



## बदनापूर जिल्हा परिषद शाळेजवळील घटना

नागरिक मागे लागले म्हणून पळून जाताना जनावरे चोरून नेणारा व्यक्ती पडला विहिरीत

जालना - एका जणाच्या शेतातून बैलगाडीसह दोन बैलजोडी व एक म्हैस चोरुन घेऊन जात होता. दरम्यान, चोरटा जनावरे घेऊन जात असल्याची माहिती जनावर मालकाला मिळाली होती. यामुळे काही नागरिकांनी त्या चोरट्याचा पाठलाग सुरू केला. नागरिक मागे लागले म्हणून पळून जाताना चोरटा विहिरीत पडल्याची ही घटना बदनापूर तालुक्यातील निकळक येथील जिल्हा परिषदेच्या शाळेजवळ शनिवारी रात्री १० वाजेच्या सुमारास घडली. त्या चोरट्याला विहिरीच्या बाहेर काढून पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

या प्रकरणात राम नागवे (सोमठाणा) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कृष्णा ऊर्फ पप्पू बबनराव शिमगे (राममूर्ती, ता. जालना, ह.मु. बापकळ, ता. बदनापूर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा अधिक तपास हवालदार ज्योती खरात ह्या करीत आहेत. चोरटा विहिरीत पडल्यानंतर या परिसरात मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती.


# धास्ती सरली: पथके तरीही रात्री वाळूचा उपसा, कारवाई कोण करणार ?

अंबड ।प्रतिनिधी

तालुक्यातील शहागड गोदावरी नदी पात्रातुन रात्री अवैध वाळु उपसा जोरात सुरू आहे.या अवैध वाळु उपस्यामुळे मोठ मोठे खड्डे पडले असुन गोदावरी नदी आहे की खदान हे कळत नाही या मोठ मोठे खड्डयामुळे पाण्यासाठी नागरीकांना कसरत करावी लागत आहे.प्रशासनाने अवैध वाळू उपसा रोखण्यासाठी विशेष पथकांची टीम तयार केली.



पथकांनी हप्ता न देणार्या वाळु तस्करावर व वाहनांवरच कारवाई करत असल्याचे बोलले जात आहे, तर शहागड परिसरातून दररोज सुमारे लाखो ब्रास वाळूचा अवैध उपसा होत आहे. हा अवैध उपसा आजमितीस तरी प्रशासनाला रोखणे शक्य असल्याचे दिसत नाही. या अवैध वाळू उपसा करणाऱ्या वाहनांवर कारवाई कोण करणार.



**बीड - शिवसंग्राम बीड शहर अध्यक्षपदी सुहास पाटील यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करतांना उद्योगपती नितिनचंद्र कोटेचा, ॲड.राम औटे, ॲड.बाळासाहेब कुलकर्णी.**


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT